# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : २८.०३.२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक : २**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन् २०१०-२०११ चे सुधारित अंदाजपत्रक व सन् २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

--------------------

**ठराव क्रमांक : ६५२६** **दिनांक : २८/०३/२०११**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २०१०-२०११ च्या सुधारित अंदाजपत्रक रु.२०८.०५ कोटी रक्कमेच्या शिलकीच्या अंदाजपत्रकास व सन २०११-२०१२ च्या रु.३४७.५८ कोटी रक्कमेच्या तुटीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच बांधकाम कार्यक्रमास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
दिनांक : २२.०६.२०११ रोजी सायंकाळी ४.३० वाजता
आयोजित केलेल्या २३८ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

**बाब क्रमांक : २३८/२**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २००९-१० या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५२७ दिनांक : २२/०६/२०११**

एकमताने असा निर्णय घेण्यात आला कीं, प्राधिकरणाच्या वित्त विभागाने सादर केलेला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन् २००९-२०१० या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा एकमताने स्विकृत करण्यात येत आहे.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३८/३**

**विषय :- म्हाडातर्फे प्रगतीपथावर असलेल्या गिरणी कामगारांच्या सदनिकांच्या किंमतीबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५२८ दिनांक : २२/०६/२०११**

एकमताने निर्णय घेताला की -

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली ५८ (१) (ब) अन्वये बांधण्यात आलेल्या गिरणी कामगारांच्या सदनिकांची किंमत ठरवितांना अनुषंगिक व अकल्पित खर्च १० टक्क्याऐवजी २ टक्के आकारण्यात यावे व १५% देखरेख शुल्क वगळण्यात यावे. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत मिळणारे अनुदान रु.२.०६ लक्ष व्याजाच्या भांडवलीकरणापूर्वी वजा करण्याची संमती देण्यात येत आहे.

न्यू हिंद मिल येथील सदनिकांसाठी २ % अनुषंगिक व अकल्पित खर्च गृहित धरल्यास व देखरेख शुल्क वगळल्यास सदनिकेची किंमत रुपये १२.६२ लक्ष ऐवजी रुपये ८.३२ लक्ष (जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत रुपये २.०६ लक्ष अनुदान वगळता ) येते. तसेच उर्वरीत १० ठिकाणी बांधकाम चालू असलेल्या सदनिकांची किंमत न्यु हिंद मिल प्रमाणे गृहित धरुन खाली नमुद केल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजनेचे ठिकाण | सदनिकची किंमत केंद्र शासनाचे रुपये २.०६ लक्ष अनुदान वजा करुन |
|---|---|---|
| १ | न्यू हिंद मिल, माझगांव | ८.३२ |
| २ | पिरामल मिल, लोअर परेल | ८.१८ |
| ३ | स्टॅंडर्ड मिल, प्रभादेवी | ८.५५ |
| ४ | श्रीराम मिल, वरळी | ८.५१ |
| ५ | स्वदेशी मिल, चुनाभट्टी | ८.३९ |
| ६ | मोरारजी मिल, कांदीवली | ८.२८ |
| ७ | मोरारजी मिल, पहाडी गोरेगांव | ८.२६ |
| ८ | स्वान मिल, कुर्ला | ४.८१ |
| ९ | स्वान मिल, शिवडी | ८.०३ |
| १० | स्टॅंडर्ड मिल, शिवडी | ९.३५ |
| ११ | सिंप्लेक्स मिल, भायखळा | ८.६० |

उपरोक्त ११ गिरण्यांपैकी स्वान मिल कुर्ला येथील इमारती तळ + ७ मजल्यांच्या असून त्यांची किंमत रुपये ४.८१ लक्ष प्रस्तावित आहे. उर्वरित गिरण्या हया १८ ते २४ मजल्यांच्या असून त्यांची सरासरी किंमत रुपये ८.३४ लक्ष

प्रस्तावित आहे. या अनुषंगाने स्वान मिल कुर्ला येथील सदनिकांची किंमत रुपये ४.८१ लक्ष व उर्वरित इतर सर्व गिरण्यांच्या सदनिकांची किंमत रुपये ८.३४ लक्ष आहे. सदरहू किंमत शासनास कळविण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २३८/५**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २००८-२००९ या वित्तीय वर्षाचा लेखा लेखा परिक्षण अहवालासह प्राधिकरणाच्या बैठकीत अवलोकनार्थ ठेवण्याबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५२९** **दिनांक : २२/०६/२०११**

प्राधिकरणाने एकमताने असा निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाच्या वित्त विभागाने सादर केलेला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन् २००८-२००९ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखा एकमताने स्विकृत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३८/६**

**विषय :- आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील गृहनिर्माण कार्यक्रम राबविण्या-साठी निर्माण करण्यात आलेल्या राखीव निधीबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६५३०** **दिनांक : २२/०६/२०११**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, राष्ट्रीय घर बांधणी योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटासाठी घरे बांधताना ती हुडको या तत्सम वित्तीय संस्थांकडून कर्ज न घेता म्हाडा फंडातून कर्ज देऊन बांधवीत, असा निर्णय प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ५९८९ दिनांक ९/०१/२००४ नुसार झाल्याने म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १६२ नुसार प्राधिकरणाचा खाते क्र. २००४५३०४३९४ मध्ये रु. २५.०० कोटीचे गुंतवणूकीद्वारे Loan Advance Reserve Fund या नावे निर्माण करण्यात आलेला राखीव निधी रद्दबातल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३८/११**

**विषय :- मोतीलाल नगर १ व २ गोरेगांव (पश्चिम ) येथील मुंबई मंडळाच्या वसाहतीतील पाणी पुरवठा व्यवस्थेची श्रेणीवाढ योजना करणेबाबत.**

----------------------------------------

**निविदांवर निर्णय घेण्याबाबत.**

**ठराव क्रमांक : ६५३१** **दिनांक : २२/०६/२०११**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, मोतीलाल नगर-१ व २, गोरेगांव येथील मंडळाच्या वसाहतीतील पाणी पुरवठयाच्या व्यवस्थेच्या कामाचे निम्नतम निविदाकार मे.वालसन्स यांनी दिलेला दर ३७.९० टक्के कमी अनुसार सदर कामाच्या निविदेतील अटीनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३७.९० टक्के इतकी रक्कम " अतिरिक्त सुरक्षा रक्कम " म्हणून घेवून निविदा मंजूर करण्यात येत आहे. सदर होणारा खर्च भविष्यकालीन पुनर्विकासाचेवेळी २.५ एफएसआय वापरताना किंवा तशी परवानगी देताना सव्याज वसूल करण्यात यावा.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३८/१२**

**विषय :- जागळे तालूका दापोली जिल्हा रत्नागिरी येथील म्हाडा योजनेकरिता लागणा-या पोहोच रस्त्याकरिता जमिनी संपादन करणे.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५३२** **दिनांक : २२/०६/२०११**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, गांव जोगळे, ता.दापोली, जिल्हा रत्नागिरी येथील म्हाडाच्या जमिनीवर विकसित भूखंड योजना राबविण्यासाठी पोहोच रस्त्याकरिता श्री.कदम परिवार व श्री.दांडेकर यांचे मालकीची एकूण १३४५.०० चौ.मि. जमीन म्हाड कलम ५२ अंतर्गत रु. ९,४१,५००/- या किंमतीस

खरेदी करण्यास, सदर भूसंपादनासाठी येणारा खर्च या जागेवर प्रस्तावित योजनेच्या विक्री किंमतीमध्ये समाविष्ट करण्याच्या अटीवर प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २३८/१५**

**विषय :- (म्हाडा जमिनीची विल्हेवाट ) विनियम १९८१ मधील विनियम १३ अंतर्गत ठेवलेल्या आरक्षणाच्या तरतूदीबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५३३** **दिनांक : २२/०६/२०११**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणात विविध प्रवर्गाकरिता असलेल्या ४९ टक्के आरक्षणात अपंगांकरिता असलेले २ टक्के आरक्षण हे २ टक्क्या ऐवजी ३ टक्के करण्यास व म्हाडातील एकूण विविध प्रवर्गाचे ४९% असलेले आरक्षण ५०% करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.